नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०६/२०२६ (मंगळवार)**

## घरफोडीचा गुन्हा उघड, आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक २४/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून घरफोडीचे गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार **१) रामेश्वर उर्फ दादा रामराव धुर्वे, वय २६ वर्षे, राहणार संजय कॉलनी, बैतूल मध्यप्रदेश २) रोशन उर्फ रुसू दीपक नागवत, वय २५ वर्षे, राहणार ग्रीन सिटी बैतूल मध्य प्रदेश** यांना निष्पन्न केले. दिनांक २४/०६/२०२६ रोजी आरोपी क्र. १) यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी आरोपी क्रं २) आणि त्याच्या आणखी एका साथीदारांसह रामटेक बाबा, ले आउट, काटोल येथे दिनांक २७/४/२०२६ रोजी घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी क्रं २) **रोशन उर्फ रुसू दीपक नागवत, वय २५ वर्षे, रा. ग्रीन सिटी बैतूल मध्य प्रदेश हा मध्यवर्ती कारागृह मुलताई येथे बंदी असल्याने त्याचे प्रोडक्शन वॉरंट घेवुन नमुद आरोपीला ताब्यात घेतले.**

**पोलीस स्टेशन काटोल अप क्र. ५००/२६ कलम ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं. हा गुन्हा उघड झाला आहे.**

## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला तात्काळ अटक

**पोलीस स्टेशन सावनेर** :– फिर्यादी नामे धनराज देवनाथ बरबड,वय ४४ वर्ष,रा वार्ड नं ०२ बाजार चौक धापेवाडा, ता. कळमेश्वर, जि. नागपुर यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की, दिनांक २९/०६/२६ चे दुपारी ०३/००वा ते ०३/३० वाजेच्या सुमारास आरोपी नामे राजु लक्ष्मण बरबड ,वय ४८ वर्ष, रा वार्ड नं ०२, बाजार चौक, धापेवाडा, ता. कळमेश्वर, जि. नागपुर हा फिर्यादीचा नातेवाईक असुन नमुद आरोपीने जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीच्या घरी वार्ड नं ०२ बाजार चौक धापेवाडा येथे जावुन फिर्यादीच्या अंगावर तसेच फिर्यादीच्या घरी कामानिमित्य आलेल्या दोन तरूणींच्या अंगावर पेट्रोल टाकुन आग लावुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेत फिर्यादी आणि दोन तरूणी किरकोळ जखमी झाल्या आहेत. सदर प्रकरणी आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम १०९(१),३२६(ग), ३५१(३), ३५२ भान्यासं सहकलम ३७ (१) (सी), १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांनी आरोपी नामे राजु लक्ष्मण बरबड,वय ४८ वर्ष ,रा वार्ड नं ०२ बाजार चौक धापेवाडा,ता कळमेश्वर जि नागपुर, याला तात्काळ ताब्यात घेवुन अटक केली आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०४ गुन्हे नोंद.

दिनांक २९/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, मौदा, कुही यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते खेळणाऱ्या तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण १२३५/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे विरेंद्र भावेश डोंगरे, वय २२ वर्ष, रा. टाकळघाट महाराज चौक, ता. हिंगणा, जि. नागपुर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १) यशवंत भालेराव सेलोकर, वय ३६ वर्ष, रा.मांढळ ता. कुही २) मनोज मधुकर लारोकर, वय ४० वर्ष, रा. ईमली चौक मांढळ, ता. कुही यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे २ गुन्हे नोंद. नमुद सर्व आरोपी हे अवैध रित्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आल्याने त्यांचेवर गुन्हे नोंद करण्यात आले आहे. तसेच **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) खुशाल बाबुराव लांजेवार, वय ५२ वर्ष, २) प्रेमदार जगन वाडीभस्मे, वय ५८ वर्ष, दोन्ही रा. माथनी, ता. मौदा हे आरोपी ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०१ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक २९/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ९०१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे जफर इब्राहीम शेख, वय ५६ वर्ष, रा. धोतीवाडा याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे देवानंद केसरीलाल भोसले, वय ४७ वर्ष, रा. गोंडखैरी बरड याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) जनिक चिरकुट टेकाम, वय ६० वर्ष, रा. उमरी २) अरविंद यादोराव खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा. नागलवाडी याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) अनिल बाळकृष्ण शेंडे, वय ३८ वर्ष, रा. माथनी ता. मौदा, जि. नागपूर २) अभिषेक संभल टेकाम, वय २२ वर्ष, रा. मोहगाव मुकासा, जि. छिंदवाडा, ह. मु. चंद्रा सिमेंट कंपनी पावडदौना रोड, मौदा, ता. मौदा ३) मंगेश नथ्थु बावणे, वय ५१ वर्ष, रा. शिंगोरी, ता. मौदा, जि. नागपूर याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) विनोद लखन कोरचे, वय

२९ वर्ष, रा. नवेगाव चिचदा, ता. रामटेक २) सहदेव गंगाराम भलावी, वय ६१ वर्ष, कमकासुर, ता. तुमसर जि. भंडारा ३) कमलेश लक्ष्मण इनवाते, रा. बंजार पथरई, ता. रामटेक ४) महिला आरोपी याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ४ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ८१० मिली देशी दारू, ८७ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ९०१५/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३०/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७५५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे २६ आरोपी अशा एकुण १५५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे २१ आरोपी अशा एकुण ७४रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २२ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६० आरोपी, पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३६ आरोपी अशा एकुण १७४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने